# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/06/2023 (बुधवार) सकाळ


### अवैध रेती (गौणखनिज) साठयांवर
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या आदेशावरून अवैध रेतीचा साठयावर कारवाई करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेतील पथक हे सावनेर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना पोस्टे खापा हद्दीतील पंजाबराव खैर गावाजवळ असलेला खैरी नाल्या जवळ खुल्या जागेत सार्वजनिक ठिकाणी अवैधरीत्या विनापरवाना रेतीसाठा आहे. अशा मिळालेल्या गोपनीय खबरेवरून दिनांक २१/०६/२०२३ रोजी १३.०० वा. दरम्यान खैरी नाल्याजवळ जागोजागी खुल्या जागेत लावारीसरीत्या रेतीचा साठा दिसुन आला.

नमुद घटनास्थळी रेड टाकुन अवैध रेतीच्या साठयावर कारवाई करून एकुण १३० ब्रास रेती गौणखनिज साठा प्रत्येकी ब्रॉस रेती २६००/—रू. प्रमाणे असा एकुण किंमती अंदाजे ३,३८,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून कारवाई करण्यात आली. नमुद अवैधरीत्या विनापरवाना रेती (गौणखनिज) चा साठयावर आळा घालुन दंडात्मक कार्यवाही करण्याकरीता मा. तहसिलदार सावनेर यांना पत्रव्यवहार करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण पोलीस अधीक्षक मा. श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजेश रेवतकर, पोलीस नायक किशोर वानखेडे, आशिष मुंगळे, उमेश फुलबेल यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर